# नागपूर महानगरपालिका, नागपूर

(Year End ची थीम घ्यावी)

## सरत्या वर्षातील मनपाच्या कार्याचा आढावा

## (Heading) जी-२० ने नागपूरच्या सौंदर्यात भर

### मनपा आयुक्त, स्मार्ट सिटी सीईओ, दोन अतिरिक्त आयुक्तांनी दिली प्रशासकीय यंत्रणेला गती

**नागपूर, ता. ३१ :** आनंद, चैतन्य आणि उमेदीने सुरू झालेले २०२३ हे वर्ष आता मावळतीला आले आहे. या सरत्या वर्षाने अनेक कडू गोड आठवणी आणि चिरकाळ स्मरणात रहाव्यात अशा पाउलखुणा उमटविल्या आहेत. नागपूर शहराची पालकसंस्था म्हणून नागपूर महानगरपालिकेने २०२३ या वर्षात अनेक महत्वाचे निर्णय घेतले, अनेक प्रकल्पांना मूर्तरूप दिले, अनेकांच्या स्वप्नांच्या प्रतिपूर्तीत भूमिका बजावली तर संकटाच्या क्षणी खंबीरपणे साथही दिली. सरत्या वर्षातील बदल, आव्हाने आणि महत्वपूर्ण कार्यांचा नागपूर महानगरपालिकेद्वारे घेण्यात आलेला आढावा...

**जी-२० शिखर परिषदेच्या निमित्ताने शहराचा कायापालट (G-20 रोषणाईचे फोटो घ्यावेत)**

२०२३ हे वर्ष भारतासाठी जी-२० शिखर परिषदेचे अध्यक्षपद घेउन आले. यातील सी-२० अर्थात सिव्हिल सोसायटी ऑर्गनायजेशनच्या बैठकीची सुरूवात नागपूर शहरातून झाली. केरळ राज्यातील माता अमृतानंदमयी मठाच्या संस्थापिका अमृतानंदमयी ऊर्फ अम्मा यांच्या अध्यक्षतेत २१ आणि २२ मार्च रोजी नागपुरात झालेल्या सी-२० बैठकांच्या आयोजनासाठी नागपूर शहराचे पूर्ण रुपच पालटले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळापासून ते फुटाळा तलाव, तेलंखेडी उद्यानापर्यंत सगळीकडे रोषणाई करण्यात आली होती. ही रोषणाई अनुभवण्यासाठी रात्री उशीरापर्यंत नागपुरकरांची रस्त्यांवर झुंबड उडाली होती. या ऐतिहासिक क्षणांची साक्ष देणारे अनेक स्थायी निर्माणकार्य देखील शहरात झालेले आहेत.

**मनपाच्या सन्मानात आणखी दोन पुरस्कारांची भर (NMC Award नावाने फोटो)**

२०२३ या वर्षात नागपूर महानगरपालिकेच्या पुरस्कारांच्या यादीत दोन पुरस्कारांची भर पडली. राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शहर सौंदर्यीकरण अभियान राबविण्याबाबत घेण्यात आलेल्या शहर सौंदर्यीकरण व स्वच्छता स्पर्धेमध्ये नागपूर महानगरपालिकेने प्रथम क्रमांक प्राप्त केला. राज्य शहर सौंदर्यीकरण स्पर्धेत विजेते ठरलेल्या नागपूर महानगरपालिकेला पुरस्कार स्वरूपात १५ कोटी रुपये प्राप्त झाले. तर महाराष्ट्र राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने नागपूर महानगरपालिकेला GeoCivic मालमत्ता कर व्यवस्थापन प्रणालीसाठी राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता प्रथम पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**मनपाचा ३२६७.६३ कोटींचा अर्थसंकल्प (Budjet नावाने फोटो)**

नागपूर महानगरपालिकेच्या इतिहासातील सर्वात मोठा अर्थसंकल्प २०२३-२४ या आर्थिक वर्षात मांडला गेला. मनपाचे तत्कालीन आयुक्त आणि प्रशासक श्री. राधाकृष्णन बी. यांनी २०२३-२४ या वर्षाचा ३२६७.६३ कोटींचा अर्थसंकल्प मांडला. याशिवाय या वर्षात तिकीट दरात कुठलीही दरवाढ नाही, डिझेल बसेस कमी करून पर्यावरणपूरक ईलेक्ट्रिक बसेसचा अंतर्भाव असलेला परिवहन विभागाचा अर्थसंकल्प तत्कालीन परिवहन व्यवस्थापक श्री. रवींद्र भेलावे यांनी मनपा आयुक्त तथा प्रशासकांना परिवहन विभागाचा अर्थसंकल्प सुपूर्द केला.

**मनपाला मिळाले नवे आयुक्त व अतिरिक्त आयुक्त (New Commissioner नावाने फोटो)**

नागपूर महानगरपालिकेला या वर्षात नवीन प्रशासकीय अधिका-यांच्या नेतृत्वाची भेट मिळाली. ३१ जूनला श्री. राधाकृष्णन बी. यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर ४ जुलै रोजी डॉ. अभिजीत चौधरी यांनी नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त आणि प्रशासक म्हणून पदभार स्वीकारला. यानंतर ३१ जुलैला श्रीमती आंचल सूद गोयल यांनी अतिरिक्त आयुक्त (शहर) म्हणून व पुढे काही दिवसांनी डॉ. सुनील लहाने यांनी अतिरिक्त आयुक्त (सामान्य) म्हणून पदभार स्वीकारला. याशिवाय नागपूर स्मार्ट अँड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून श्री. पृथ्वीराज बी.पी. यांनी २६ जुलै रोजी पदाची सूत्रे हाती घेतली. प्रशासनातील दीर्घ अनुभव असलेल्या या अधिका-यांच्या नियुक्तीने मनपाच्या प्रशासकीय यंत्रणेला गती मिळाली आहे.

**शहरात उद्भवली पूर परिस्थिती ; लोकप्रतिनिधी, प्रशासन ते नागरिक सर्वांनीच दिला धीर (Flood नावाने फोटो - एक पेक्षा जास्त फोटो घ्यावेत)**

सरत्या वर्षातील आठवणींमध्ये नागपूर शहरात उद्भवलेली पूर परिस्थिती ही अंगावर शहारे आणणारी घटना म्हणून स्मरणात राहील. २२ सप्टेंबरच्या मध्यरात्री शहरात ढगफुटी सदृश्य पाउस आले व त्यामुळे नाग नदी, पिवळी नदीला मोठा पूर आला. या संपूर्ण परिस्थितीत केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी, राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, मदत व पुनर्वसन मंत्री श्री. अनिल पाटील यांचेकडून वेळोवेळी आढावा घेण्यात आला पुढे बैठक घेउन संपूर्ण परिस्थितीवर दिलासादायक निर्णय देखील घेण्यात आला. तर आमदार चंद्रशेखर बावनकुळे, मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, माजी महापौर तथा उपमुख्यमंत्र्यांचे मानद सचिव श्री. संदीप जोशी यांनी थेट मनपा मुख्यालयातील 'श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी सिटी ऑपरेशन सेंटर' (सीओसी) सेंटरमधून तर कधी प्रत्यक्ष वेगवेगळ्या ठिकाणी भेट देउन परिस्थितीचा आढावा घेतला. प्रत्यक्ष घटनास्थळांवर मनपाच्या अग्निशमन व आणिबाणी सेवा पथकासह राज्य आपत्ती प्रतिसाद दल, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, भारतीय सैन्य दल आणि आपदा मित्र दलाच्या चमूद्वारे एकूण ३५० पेक्षा जास्त नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीतून सुखरुप बाहेर काढून विस्थापित केंद्रामध्ये पाठविण्यात आले. प्रभावित भागातील नागरिकांना अन्नधान्याच्या कीट वितरीत करण्यात आल्या.

**राष्ट्रीय क्षमता बांधणी कार्यशाळेत मनपावर कौतुकाची थाप**

केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालय आणि क्षमता बांधणी आयोग (सीबीसी) यांच्या संयुक्त विद्यमाने दिल्ली येथे आयोजित राष्ट्रीय स्तरावरील क्षमता बांधणी कार्यशाळेमध्ये नागपूर महानगरपालिकेवर कौतुकाची थाप पडली. केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार आणि पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री मा. श्री. हरदीप सिंह पुरी यांच्या अध्यक्षतेत दिल्ली येथे पार पडलेल्या राष्ट्रीय क्षमता बांधणी कार्यशाळेमध्ये क्षमता बांधणी आयोगाच्या कार्याची नागपूर महानगरपालिकेत उत्तमरित्या अंमलबजावणी केल्याबद्दल मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांचा सन्मान करण्यात आला.

**मेरी माटी मेरा देश : शहरातील माती कर्तव्यपथवर (Meri Maati नावाने फोटो)**

केंद्र शासनाच्या पुढाकाराने संपूर्ण देशभरात 'मेरी माटी मेरा देश' हा देशाभिमान उंचावणारा अभियान राबविण्यात आला. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या अनुषंगाने राबविण्यात आलेल्या या महोत्सवात नागपूर शहराने उत्साहाने सहभाग घेतला. अभियानांतर्गत मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या नेतृत्वात उत्तम कार्य झाले. विविध शाळांमध्ये शिलाफलकम उभारण्यात आले. अनेक ठिकाणी वृक्षारोपण करून वसुधा वंदन करण्यात आले. हातामध्ये माती घेउन पंच प्रण प्रतिज्ञा घेण्यात आली. देशासाठी आपली अमूल्य सेवा देणा-या माजी सैनिकांचा सन्मान करून वीरों का वंदन करण्यात करण्यात आले. अनेक ठिकाणी सेल्फी पॉईंट उभारण्यात आले. संकलीत करण्यात आलेली माती ढोलताशाच्या गजरात मनपा मुख्यालयात आणून ती प्रतिनिधींमार्फत मुंबई आणि तिथून देशाची राजधानी दिल्लीतील कर्तव्यपथवर पाठविण्यात आली.

**योजनांचा लाभ मिळवून देणारी विकसीत भारत संकल्प यात्रा (Viksit Bharat नावाने फोटो)**

केंद्र सरकार, राज्य सरकार आणि नागपूर महानगरपालिकेच्या विविध योजनांपासून कुणीही वंचित राहू नये यासाठी मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्याद्वारे सुरू करण्यात आलेल्या विकसीत भारत संकल्प यात्रेला नागपूर शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सरत्या वर्षात या संकल्प यात्रेच्या माध्यमातून २५ हजारावर लाभार्थ्यांनी विविध योजनांचा लाभ घेतला. मनपाच्या दहाही झोनमधील विविध भागांमध्ये या यात्रेचे आयोजन करण्यात आले. विविध शासकीय योजनांचा लाभ मिळाल्याने जीवनात झालेले परिवर्तन लाभार्थी स्वत: 'मेरी कहानी, मेरी जुबानी'च्या माध्यमातून मांडताहेत.

**१ ऑक्टोबर १ तास : 'स्वच्छता ही सेवा' (Swachhata hi seva नावाने फोटो)**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीच्या अनुषंगाने १ ऑक्टोबरला १ तास स्वच्छतेचा अनोखा उपक्रम 'स्वच्छता ही सेवा' देशभर राबविण्यात आला. नागपूर महानगरपालिकेद्वारे शहरातील महत्वाच्या ७३ ठिकाणी श्रमदानातून स्वच्छता अभियान राबविण्यात आले. नागपूर शहरातील जागतिक कीर्तीची

दीक्षाभूमी, हेरिटेज स्थळ कस्तुरचंद पार्क, प्रधान डाक कार्यालय (जीपीओ), ऐतिहासिक श्रीमंत महाराणी सती काशीबाई साहेब भोसले राजघाट (काशी बाई देवस्थान), गांधीसागर तलाव व चाचा नेहरू उद्यान, भारतमाता व डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान सीए रोड, सोनेगाव तलाव, सक्करदरा चौक, तिरंगा चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ, रेल्वे स्टेशन, डॉ. आंबेडकर उद्यान वैशाली नगर, मनपा मुख्यालय यासारख्या विविध ठिकाणी नागपूर महानगरपालिकेद्वारे १५० स्वयंसेवी संस्था आणि सुमारे २० हजाराहून अधिक नागरिकांच्या सहकार्याने स्वच्छता करण्यात आली.

**APJAKSLV-मिशन २०२३ च्या यशात मनपाच्या विद्यार्थ्यांचा सहभाग (APJAKSLV नावाने फोटो)**

देशाचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी हाऊस ऑफ कलाम, स्पेस झोन इंडीया मार्टीन ग्रुप यांच्यावतीने डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम सॅटेलाईट लॉन्च व्हेईकल मिशन २०२३ चे आयोजन करण्यात आले होते. तामिळनाडुतील पट्टीपुरम येथून १५० पिको सॅटेलाईट रॉकेटसह अवकाशात सोडण्यात आले. या अभियानामध्ये नागपूर महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन यशस्वी अभियान राबविले. विद्यार्थ्यांच्या यशस्वी कामगिरीबद्दल त्यांचे सर्व स्तरावर कौतुक झाले.

**महिला दिनी गुलाबपुष्पाने महिलांचे स्वागत (women day नावाने फोटो)**

८ मार्च जागतिक महिला दिनाच्या औचित्याने नागपूर महानगरपालिकेमध्ये येणा-या प्रत्येक महिलांचे गुलाब पुष्पाने स्वागत करण्यात आले. उद्यान विभागाद्वारे मनपातील सर्व कर्मचारी तसेच अभ्यागत महिलांना प्रवेशद्वारावर गुलाबाचे फुल देउन त्यांना महिला दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. मनपाच्या या उपक्रमाने भारावलेल्या महिलांनीही या सन्मानाचे कौतुक करीत शुभेच्छांचा स्वीकार केला.

**पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी प्रशासकीय यंत्रणांचे समन्वयन (Ganeshotsav नावाने फोटो)**

नागपूर शहरात पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा व्हावा, गणेशोत्सव मंडळांना विविध प्रकारच्या परवानग्या एकाच व्यासपीठावर मिळाव्यात यादृष्टीने नागपूर शहरातील विविध यंत्रणांनी एकत्र येत अनोखा आदर्श घडविला. नागपूर महानगरपालिका, पोलिस विभाग, जिल्हा प्रशासन या सर्वांनी एकत्र येउन सर्व गणेशोत्सव मंडळांची संयुक्त बैठक कविवर्य सुरेश भट सभागृहामध्ये घेतली.

**शहराला मिळाले १० आरोग्य वर्धिनी केंद्र (Arogya Vardhini नावाने फोटो)**

नागपूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने २०२३ वर्षात नागपूर शहराला १० नवीन आरोग्य वर्धिनी केंद्र मिळाले. मनपाद्वारे श्याम नगर वैष्णोदेवी नगर पारडी, रामटेके टोली रहाटे नगर नगर टोली लोहार समाज भवन, पुष्कर सोसायटी रोसे नगर (झिंगाबाई टाकळी १०), नागोबा मंदिर न्यू म्हाळगी नगर बेसा पॉवर हाउस जवळ, बाबा दिप सिंग नगर नारी रोड उप्पलवाडी, मनीष नगर बेलतरोडी रोड, भिवसेनखोरी भिमसेना नगर हजारीपहाड, चुनाभट्टी जुनी अजनी अंबिका नगर, रेणुका

माता मंदिर यशोदा नगर हिंगणा रोड आणि बर्डे लेआउट बोरगाव उर्दू प्राथमिक शाळा बोरगाव या दहा ठिकाणचे आरोग्य वर्धिनी केंद्र नागरिकांच्या सुविधेसाठी सुरू झाले.

**स्वच्छतेसाठी महिलांचा 'स्वच्छ मशाल मार्च' (Mashal March नावाने फोटो)**

स्वच्छोत्सव-२०२३ अंतर्गत नागपूर महानगरपालिकेद्वारे मार्चमध्ये मनपाच्या स्वच्छता कर्मचारी महिलांसह शहरातील विविध बचत गटांच्या महिलांचा उत्स्फूर्त सहभाग असलेली 'स्वच्छ यात्रा' व 'स्वच्छ मशाल मार्च' काढण्यात आला. मनपाच्या महिला स्वच्छता कर्मचारी, अनेक बचत गटाच्या महिला, स्वछता समाजसेवी संस्था व स्वछताप्रेमीं अशा ५०० च्या वर महिलांनी सहभाग नोंदवून स्वच्छतेविषयी जागर केला.

**मनपा क्षेत्रातील वृक्ष गणनेला सुरुवात (Tree नावाने फोटो)**

महाराष्ट्र (नागरीक्षेत्र) वृक्षसंवर्धन कायदा (Arboriculture Act) अंतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या उद्यान विभागामार्फत मनपा क्षेत्रात असणाऱ्या विविध वृक्षांची गणना करण्यासाठी वृक्षगणना सुरू करण्यात आली. शहरातील २६२ वर्ष जुन्या पिंपळाच्या वृक्षाचे नागपूर महानगरपालिका आयुक्तांद्वारे पूजन करून अभियानाची सुरूवात करण्यात आली.

**नदी स्वच्छता अभियान (River Cleaning नावाने फोटो)**

नागपूर शहरातून वाहणा-या नाग नदी, पिवळी नदी व पोहरा नदी यांची दरवर्षी पावसाळ्यापूर्वी संपूर्ण स्वच्छता केली जाते. नागपूर महानगपालिकेद्वारे यंदाही या तिनही नद्यांच्या पात्रांची उन्हाळ्यात स्वच्छता करण्यात आली. या स्वच्छता अभियानातून सुमारे ०.८ - १.५ लक्ष मेट्रिक टन गाळ काढण्यात आला. नदीतून वाहणाऱ्या पाण्याची क्षमता वाढावी आणि नदी काठावर असलेल्या वस्त्यांत पावसाळ्यात येणाऱ्या पूरापासून सुरक्षा प्रदान व्हावी या मागील हेतू आहे.

**शासन आपल्या दारी (Shasan Aplya Daari)**

महाराष्ट्र शासनाच्या विविध कल्याणकारी योजना थेट जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने नागपूर महानगरपालिकेद्वारे शहरातील विविध भागांमध्ये शासनाच्या 'शासन आपल्या दारी' अभियानाची अंमलबजावणी केली. मनपाद्वारे सुमारे ७ लाखावर लाभार्थ्यांना या अभियानाचा लाभ मिळवून देण्यात आला.

**विद्यापीठ ते झिरो माईल मार्गाला स्व. दत्ताजी डिडोळकरांचे नाव (Didolkar नावाने फोटो)**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ ते झिरो माईल फ्रीडम पार्क या मार्गाला नागपूर महानगरपालिकेद्वारे 'स्व. दत्ताजी डिडोळकर मार्ग' हे नाव देण्यात आले. स्व. दत्ताजी डिडोळकर

जन्मशताब्दी समारोह आयोजन समितीचे अध्यक्ष केंद्रीय मंत्री श्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेत कार्यक्रम पार पडला.

**दीक्षाभूमीवर अनुयायांसाठी सेवाकार्य (Deekshaboomi नावाने फोटो)**

धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या अनुषंगाने २२ ते २५ ऑक्टोबर हे चार दिवस नागपूर महानगरपालिकेद्वारे बौद्ध अनुयायांसाठी अहोरात्र सेवाकार्य करण्यात आले. स्वच्छता, आरोग्य, निवास, प्रकाश, पाणी, सुरक्षा ही सर्व व्यवस्था मनपाद्वारे दीक्षाभूमी व परिसरात करण्यात आली.

**५ हजार दिव्यांनी उजळला मनपा परिसर (Diwali नावाने फोटो)**

नागपूर महानगरपालिकेमध्ये यंदाची दिवाळी अगदी खास ठरली. मनपामध्ये कार्यरत अधिकारी आणि कर्मचारी यांनी एकत्र येत मनपा परिसरात सुमारे ५ हजार दिवे प्रज्वलीत करून दिवाळी साजरी केली. केंद्र सरकारच्या निर्देशानुसार नागपूर महानगरपालिकेतर्फे 'स्वच्छ दिवाळी शुभ दिवाळी' मोहिम राबविण्यात आली. 'स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी'च्या आकारामध्ये लावलेल्या मातीच्या ५ हजार दिव्यांनी नागपूर महानगरपालिकेचा परिसर उजळून निघाला.

**'स्वप्ननिकेतन'मुळे हक्काच्या घराची स्वप्नपूर्ती (Swapnaniketan नावाने फोटो)**

नागपूर महानगरपालिकेच्या झोपटपट्टी पुनर्वसन प्राधिकरणद्वारे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मौजा वांजरा, कामठी रोड येथे ४८० सदनिकांचे 'स्वप्ननिकेतन' प्रकल्प उभारण्यात येणार आहे. २०२३ या वर्षाच्या सुरूवातीला या प्रकल्पाची सुरूवात झाली व याच वर्षात ऑक्टोबर महिन्या अखेरपर्यंत लॉटरी पध्दतीने लाभाऱ्थ्यांना घरांचे आवंटन देखील झाले. उत्तर नागपुरातील मौजा वांजरा, कामठी रोड येथे २८.२१ चौ.मी./३०३.६५ चौ. फुट चटई क्षेत्रफळ असलेले 1BHK सदनिकांचे प्रकल्प आहे.